विद्यापीठातील वाहन चालकांना व विद्यापीठा अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्रातील वाहन-नि-यांत्रिकी यांना देण्यांत येणा-या अतिकालीक भत्त्यामध्ये वाढ करणेबाबत.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

संदर्भ:- १. विद्यापीठ आदेश क्र. बीईओ/ड्रायव्हर/०१८२ दिनांक २१ आक्टोंबर, २०११
२. विद्यापीट ओदश क्र.बीबीए/अतिकालीकभत्ता/कृविके/वानियां/२०२१/२१२९ दिनांक ०८ जुन, २०२१
३. शासन निर्णय क्र. अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३.

## आदेश

**क्र. बीईटेक/वा.चा/अति.भत्ता/२०२३/** १७५७ **दिनांक :१५ सप्टेंबर, २०२३**

शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३ नुसार विद्यापीठातील महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील नियम ८७ च्या प्रावधानानुसार विद्यापीठ सेवेत नियमित आस्थापनेवर कार्यरत वाहन चालकांना व विद्यापीठा अंतर्गत कार्यरत असलेल्या सात कृषि विज्ञान केंद्रातील वाहन चालक-नि-यांत्रिकी यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून रू. १००/- प्रतितास या दराने अतिकालीन भत्ता लागू करण्यात येत आहे.

१. कामाच्या दिवशी ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास (भोजन समय धरून) आणि रविवार व सुटीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला रू.१००/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल.)
२. वाहन चालकास/वाहन चालक-नि-यांत्रिकी यांना एका महिन्यात मिळणारी अतिकालीक भत्त्याची एकुण रक्कम त्याच्या एकुण पगाराच्या (salary) ३० टक्के पेक्षा जास्त असु नये.
३. वाहन चालक/वाहन चालक-नि-यांत्रिकी यांना सुधारित दराप्रमाणे अतिकालीक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार वाहन चालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहतील.
४. वाहनचालक/वाहनचालक-नि-यांत्रिक यांच्या सुधारित दराप्रमाणे देण्यात येणा-या अतिकालीक भत्त्याचा खर्च यापुर्वी देण्यात येत असलेल्या लेखाशिर्षातील अनुदानातुन भागविण्यात यावा.

सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असुन सदर आदेशाची अमंलबजावणी **दि.०७ ऑगस्ट, २०२३** पासून करण्यात यावी.

मा. कुलगुरू यांचे मंजूरी व आदेशानुसार.

स्वाक्षरित/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

प्रतिलिपी-

१. अधिष्ठाता,कृषि/उद्यानविद्या/कृषि अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२. संचालक,संशोधन/विस्तार शिक्षण, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व) ........................................................................

४. विभाग प्रमुख, (सर्व) ....................................................................................

५. प्रभारी अधिकारी/प्राचार्य(सर्व)..........................................................................

६. विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल/विद्यापीठ नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

७. मा.कुलगुरूंचे स्विय सहायक/कुलगुरूंचे स्विय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

८. उपकुलसचिव (आस्था/साप्रवि), डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

९. ..........................................................................................................................

(सर्व कार्यालय प्रमुख, नियंत्रण अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येत की, आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या वाहन चालकाकडून सदर आदेशासोबत जोडलेले वचनपत्र संबंधित वाहन चालकाकडून दोन प्रतिमध्ये भरून त्याची एक प्रत त्यांचे मुळ सेवा पुस्तकात जपून ठेवून दुसरी प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी. )

कुलसचिव, २५।०९

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

## वचनपत्र

मी असे वचनपत्र लिहून देतो की, मला देण्यात येणा-या अतिकालीक भत्ता रू. १००/- प्रतितास सुधारीत दराने देतांना काही त्रृटी आढळल्यास किंवा चुकीच्या अतिकालीक भत्ता देण्यात आला असे विद्यापीठाच्या कोणत्याही प्रकारे निदर्शनास आल्यास किंवा जास्तीचे झालेले अतिप्रदान मी भविष्यात मला प्रदान करण्यात येणा-या रक्कमेतून समायोजित करून देईल किंवा इतर कोणत्याही प्रकारे मी विद्यापीठाला परत करील.

वाहन चालकाची सही

दिनांक:

ठिकाण:

कार्यालय प्रमुखाची प्रतिस्वाक्षरी